# प्रकरण सहावे

## उपसंहार

## उपसंहार

आंतरराष्ट्रीय किर्तिचे शिक्षणतज्ज्ञ ,इंडियन इंस्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे या संस्थेचे संस्थापक,भारत सरकारचे माजी शैक्षणिक सल्लागार,युनेस्को, मधील शिक्षणवेत्ता समिती मधील भारताचे प्रतिनिधी अशा विविध पदव्यानी ज्या व्यक्तीचा गौरव करावा अशा थोर विचारवंताची देणगी भारताला लाभली होती ती व्यक्ती म्हणजे पद्मभूषण डॉ.जे.पी.नाईक हे होत.

जे.पी.नाईक यांना आधुनिक ऋषी असे गणण्यात येते.अनेक महत्वाच्या पदावर काम करुनही प्रसिध्दीपासून ते अलिप्त रहात. काम करत पण श्रेय दुसऱ्याला देण्यात त्यांना आनंद वाटे. भारतीय समाज हा अत्यंत मागासलेलापण या समाजाच्या विचारात परिवर्तन आणण्यासाठी शिक्षण देणे हा एकच उपाय आहे हे जे.पी.नाईक यांनी जाणले व त्या दृष्टीने आधुनिक भारतीय समाज घडविण्यासाठी त्यानी रात्रंदिवस परिश्रम केले.अनेक योजना आखल्या,कार्यान्वित केल्या.लोकांना मदत केली. लोकांना स्फूर्ती दिली.अशा जे.पी.नाईक यांना मोठेपणा सहजा सहजी मिळालेला नसून त्यानी तो आपल्याकडे स्वकष्टाने आणल्याचे दिसते.

### बालपण व शिक्षण ( १९०७-१९१२-१९२९ )

हिमाल्यासारख्या उत्तुंग व विशाल व्यक्तिमत्व असणाऱ्या जे.पी. नाईक यांचा जन्म अत्यंत मागासलेल्या खेड्यात बहिरेवाडी ,जि:कोल्हापूर, महाराष्ट्र येथे ५ सप्टेंबर १९०७ मध्ये झाला.अत्यंत घरची गरीबी ,कुटुंबात माणसाची संख्या जास्त त्यामुळे नाईक यांचे बालपण अत्यंत कष्टात गेले.१ली ते ४थी बहिरेवाडीत शिक्षण झाले. शिक्षणास सुरुवात त्यानी ९व्या वर्षी केली. इंग्रजी १ली ते ३री पर्यन्त मेव्हण्याकडे बैलहोंगल येथे शिक्षण पूर्ण केले व इंग्रजी ४थी ,७वी बेळगांव येथे शिक्षण पूर्ण केले. सन १९२४ मध्ये बेळगांव येथून मॅट्रिक पास झाले. अखबारनीस ही शिष्यवृत्ती त्यांना मिळाली.

'जे.पी.नाईक यांचे पूर्वीचे नांव विठ्ठल हरी घोटगे हे होते पुढे स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यानंतर जयंत पांडुरंग नाईक हे नाव त्यानी धारण केले व पुढे हे नाव कायम राहिले.' [१]

कर्नाटक कॉलेज धारवाड -- येथे त्यानी कॉलेजला अॅडमिशन घेतली पण गरिबी व आर्थिक अडचणीमुळे राजाराम कॉलेज ,कोल्हापूर येथे त्यानी प्रवेश घेतला. सारस्वत बोर्डिंगमध्ये रहात .स्वत: इंटरला असूनही बी.ए.बी.एससी.च्या विद्यार्थ्यांच्या शिकवण्या घेत .या काळात फक्त अभ्यासाचे विषय न हाताळता अनेक विषयांचा परिपूर्ण अभ्यास ते करत. यात गणित,इतिहास,संस्कृत ,इंग्रजी वाङ्.मय व सामाजिक शास्त्रे यांचा समावेश होता. बी.ए.ही पदवी गणित विषय घेऊन सन १९२९ मध्ये त्यांना मिळाली. या काळात आपल्या अभ्यासाव्यतिरिक्त मित्रानाही ते अभ्यासात मदत करत.

स्वातंत्र्य चळवळीतील त्याचा सहभाग सन १९३०-१९३७

महात्मा गांधीनी सविनय कायदेभंग चळवळ सुरु केली. जे.पी.नाईक हे म.गांधीच्या विचाराने भारावले. नुकतीच लागलेली राजाराम कॉलेजची नोकरी सोडून त्यानी सत्याग्रहात भाग घेतला,१९३० - त्याना अटक होऊन त्याची रवानगी बेल्लारी येथील तुरुंगात झाली पण येथेही स्वत: न बसता चिफ ऑर्डरली म्हणून काम केले. तुरुंग खात्यासाठी सूचना सुचविणारा अहवाल जेलरच्या नावावर दिला व जेलरला बढती मिळवून दिली. आपल्या बरोबरीच्या कैद्याची सेवा करत असतानाच त्यानी आरोग्य विषयावर खूप अभ्यास केला.अनेक उपाय आत्मसात केले. १९३२ ला तुरुंगामधून सुटल्यानंतर उप्पिन बेटगिरी (जि.धारवाड ) या खेड्यात आपले कार्यक्षेत्र बनविले. प्राथमिक शिक्षण,खादी प्रसार व विनामूल्य आरोग्य सेवा हे व्रत त्यानी स्वीकारले. उप्पिन बेटगीरी गांवातील लोक त्याना ज्वारीची भाकरी थोडेसे दहि देत यावर नाईक हे दिवस काढत .महिन्याचा पाच रुपये इतकाच त्यांचा खर्च होता. उप्पिन बेटगीरी या खेड्यात केलेल्या जे.पी.नाईक यांच्या कार्यामुळे सर फ्रेड्रिक साईक्स ढाल इ.स. १९३७ मध्ये मिळाली व उप्पिन बेटिगिरी आदर्श खेडे बनले.

कर्नाटक विद्यापीठाने कुलगुरु जी.ए.पाठक यांच्या हस्ते १९६८ मध्ये

डॉक्टरेट पदवी जे.पी.नाईक यांना दिली.

आपल्या या लेख्यातील वास्तव्याचा गावकऱ्यावर मार पडू नये या जाणिवेतून नाईक साहेबांनी साध्या राहणीचे व्रत घेतले आणि ते अखेरपर्यन्त पाळले.[२]

जे.पी.नाईक यांनी धारवाड जिल्हात प्राथमिक शिक्षण प्रसार मंडळ नावाची संस्था स्थापून अनेक शाळा,काढल्या व चालविल्या.स्वतः:ही त्यांनी प्राथमिक शाळा चालविली.

मुंबई राज्यावर शैक्षणिक समितीवर सल्लागार म्हणून कार्य - १९३७-१९४० —

सन १९३७ मध्ये बाळासाहेब खेर यांचे मंत्रिमंडळ मुंबई राज्यावर आले. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण व प्रौढ शिक्षणाचा प्रसार या दोन उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी राज्य स्तरीय समितीमध्ये शिक्षणाच्या प्रगतीसाठी योजना आखण्यास जे.पी.नाईक यांना बोलविण्यात आले. १९३७ ते १९४० या दरम्यान केलेल्या शैक्षणिक समितीच्या कार्याची माहिती अत्यंत मौलिक असून इतिहासात नोंद करणे सारखीच आहे. अनेक शैक्षणिक समित्यावर नाईक यांनी काम केले. बेसिक एज्युकेशन कमिटी ही त्यापैकी होय.यात तज्ज्ञ लोक होते.पी.सी.पाटील त्यापैकी एक होते. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिकरण व प्रौढ शिक्षण प्रसार या दोन्ही प्रश्नावर नाईक यांनी अभ्यास सुरु केला.याच काळात धारवाड जिल्हात ३६ प्राथमिक शाळा सुरु केल्या.

१९३७ सालच्या निवडणूकी नंतर जे.पी.नाईक यानी आपल्या समविचारी मित्रांच्या सहाय्याने पोष्ट ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट ही संस्था स्थापन केली.[३]

कोल्हापूर मधील कार्य - १९४०-४७

कोल्हापूरमध्ये रावबहादूर पी.सी.पाटील हे कोल्हापूर संस्थानचे शिक्षण मंत्री होते. इ.डब्ल्यू.पेरी हे मुख्यमंत्री होते. या दोघांच्या आग्रहावरुन जे.पी. नाईक हे कोल्हापूरला सन १९४० मध्ये आले. कोल्हापूर संस्थानच्या शैक्षणिक प्रगतीची एक योजना आखण्यात आली ही कामगिरी नाईक यांचेकडे सोपविण्यात आली.संपूर्ण समाज जीवनासंबंधी आस्था असल्याने ही सर्वांगीण विकास योजना नाईक यांनी तयार केली व त्यांना विकास सचिव नेमण्यात आले. कोल्हापूर

संस्थानातील शैक्षणिक पुनर्घटनेचे काम वेतन न घेता केले.१८-१८ तास काम करणारा वेगळा प्रशासक म्हणून ते ओळखले जात.[४]

कोल्हापूर संस्थानात अनेकविध सुधारणा नाईक यांनी केल्या.रेल्वे,वाहतूक कारभार,पाणी पुरवठा,वीज निर्मिती, आरोग्य ,सांस्कृतिक जीवन या सर्व क्षेत्रात आधुनिकता आणण्याचा त्यानी प्रयत्न केला.

नाईक यांच्या कामाविषयी पी.सी.पाटील म्हणतात` नाईकांची मला प्राथमिक शिक्षण व स्थानिक स्वराज्य विशेषकरुन कोल्हापूर म्युनिसीपालिटीचे कामात फार मदत झाली.नाईक माझ्या बरोबर आठवड्याच्या कौन्सिलच्या बैठकीस येत असत.माझ्या कामाशिवाय ते कौन्सिलचे सेक्रेटरी म्हणून काम करु लागले. कौन्सिलच्या सर्व मंत्र्यावर त्याचे वजन चांगले पडले.` [५]

नाईक हे स्वत: कोणतेही काम मनापासून स्वीकारीत व एकदा काम घेतले की त्याची पूर्तता होईपर्यन्त त्यांना स्वास्थ नसे. मग त्यासाठी टीका सहन करावी लागली विरोध झाला तरी नाईक यांनी आपले ठरविलेले काम नेहमीच पूर्ण केले.` जे.पी.नाईक या व्यक्तीबद्दल आमची तक्रार नाही त्याच्या कल्पना भरमसाठ आणि महत्वाकांक्षी असल्यामुळे तरी त्या पारपाडण्याची त्यांना सतत तळमळ असते` असे माधवराव बागल म्हणतात.`[६]

कोल्हापूर शहर सुधारणा योजना नाईक यांनी आखली व पार पाडली. यास विरोध होत होताच पण त्यासाठी योजना लोकांना समजावून देणे त्यासाठी व्याख्याने,वृत्तपत्र प्रचार या माध्यमांचा त्यांनी वापर केला .` उद्याचे कोल्हापूर` हे पुस्तक लिहून १९४४ ला प्रकाशित केले. लोकजागृती,मतपरिवर्तन करुन अनुकूल परिणाम घेणेस नाईक पटाईत होते. कोल्हापूर शहराचा विकास करुन सुंदर कोल्हापूर ही योजना अंमलात आणण्याचे खरे श्रेय नाईक यांनाच आहे.` साधी राहणी व उच्च विचार सरणी कोणत्याही विषयात प्राविण्य मिळविण्याची कुशाग्र बुध्दि,स्वार्थाला लाथ मारुन त्यांनी स्वसंतोषाने पत्करलेली फकिरी जनतेकरिता रात्रंदिवस राबण्याची तयारी इत्यादी गुणांमुळे त्याच्याबद्दल कुणालाही आदर वाटल्यावाचून राहात नाही.`[७] असे पुढारीकार म्हणतात.

कोल्हापूर शहर सुधारणा राबविताना नुकसान होणाऱ्यांना नुकसान भरपाईही देण्यात आली. कोल्हापूर शहराबरोबर कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण विकासासाठी अनेक योजना जे.पी.नाईक यांनी तयार केल्या व त्या वस्तुस्थितीत आणल्या.

शिक्षण क्षेत्रात जे.पी.नाईक यांनी अनेक शाळा काढण्यास प्रोत्साहन दिले. ईमारती, क्रिडांगणे उपलब्ध करुन दिले. अरुंद बोळ काढून प्रशस्त रस्ते तयार करऊन घेतले. हॉस्पिटल काढले, तळी बुजविण्यात आली.नगरपालिकेचा ९० वर्षांचा इतिहास लिहिला. नगरपालिकेत सुधारणा घडवून आणल्या.

जे.पी.नाईक यांना काम करण्याचा कंटाळा नसे.एखाद्या ध्येयाने प्रेरित झाले की रात्रंदिवस काम करणे हेच त्यांचे जीवन असे. कोल्हापूर संस्थानचा पंधरा वर्षांचा विकासक्रमाचा आराखडा जे.पी.नाईक यांनीच तयार केला.

कोरगावकर ट्रस्ट मध्ये १९४८ ते १९५९ पर्यन्त कार्य --

आज सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थामध्ये कै.गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्था ही नावारुपाला आलेली संस्था आहे. सन १९४८ पासून १९५९ पर्यन्त जे.पी.नाईक यांनी कोरगांवकर संस्थेत कार्य केले. ट्रस्टच्या स्थापनेत सल्लागार पासून ते सेवक ,ट्रस्टचे सेक्रेटरी व ट्रस्टी व शेवटी अध्यक्ष म्हणून जे.पी.नाईक यांनी कार्य केले हे कार्य करत असताना इतर अनेक संस्थाना देणग्या मिळवून त्यांनाही उभे केले. ट्रस्टच्या वतीने अनेक कार्यक्रम राबविले उदा.माजी भाकर केन्द्र, महिला दक्षता समिती ,गोवूरी योजना. कोरगांवकर ट्रस्टच्या अष्टवार्षिक अहवाल लिहून काढला. सेवक संघ, मातृ संघ निर्माण केले, वसतिगृहे चालविली. गरिब विद्यार्थी,रोगपिढीत,जळीत ग्रस्त व पुरग्रस्त लोकांना ट्रस्ट तर्फे मदत पोहोचविली. क्रांतीकारकांना आश्रय दिला.

गोविंदराव कोरगांवकर यांच्या पुण्यदिनी १६ मे रोजी संम्मेलन भरवून प्रसिध्द व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली.मौनी विद्यापीठ कार्यसही कोरगांवकर ट्रस्टला सामावून घेतले. चांगली पुस्तके प्रकाशनास मदत केली.हे कार्य करत असता जे.पी.नाईक यांचे नाव बाजूलाच राहिले. ट्रस्टचे नाव पुढे राहिले. आज नावारुपाला कोरगावकर संस्था आणण्याचे श्रेय नाईक यांच्या कल्पकतेला द्यावे लागेल.

## मौनी विद्यापीठात कार्य - १९५२ --

नाईकांचा जन्म खेड्यात झालेला व ग्रामीण परिसराविषयी नाईक यांना ओढा यावून ग्रामीण विद्यापीठ ही कल्पना त्यांच्या मनात खोलवर रुजली. सन १९५२ मध्ये श्री मौनी विद्यापीठ गारगोटी (जि:कोल्हापूर ) येथे स्थापन करण्यात जे.पी.नाईक यांचा मोठा सहभाग होता. व्ही.टी.पाटील यांच्या सहकार्याने मौनी विद्यापीठ स्थापन केले.

१) प्रिन्स एज्युकेशन सोसायटी

२) इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन मुंबई

३) कोरगांवकर धर्मादाय संस्था कोल्हापू असे तीन घटक करण्यात आले.

ग्रामीण विभागात पूर्व प्राथमिक पासून विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यन्त सोय करण्यात आली. शिक्षण क्षेत्रात नवीन प्रयोग करणे, समस्या निराकरण व ग्रामीण शिक्षण ,ग्रामीण विकास योजना या दृष्टीने मौनी विद्यापीठ म्हणजे नाईक यांची शैक्षणिक प्रयोग शाळाच होती.

अनेक शाखा मौनी विद्यापीठातर्फे काढण्यात आल्या व विविध स्तरावर कार्य करण्यात आले. उदा.(१) सौ.लक्ष्मीबाई कोरगांवकर शिशुभवन, रुरल इन्स्टिटयूट ,शाहु कुमार भवन इत्यादी. अनेक कार्यक्रम राबविण्यात आले. विस्तार कार्यक्रम,आर्थिक कार्यक्रम इत्यादी सन १९५५ पर्यन्त मौनी विद्यापीठात त्यानी कार्य केले. कोणाबद्दल कसलीही तक्रार न करता नाईक यांनी मौनी विद्यापीठाचा संबंध तोडला.

गारगोटीत असतानाच सन १९५५ मध्ये चित्राताई यांच्याशी त्याचा विवाह झाला.या विवाहाने जे.पी.नाईक यांच्या जीवनाला एक वेगळे वळण लागले व स्थिरता प्राप्त झाली.

सन १९४२ मध्ये आपल्या इतर सहका-यांच्या सहकार्याने जे.पी.नाईक यांनी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन या संस्थेची स्थापना केली.याच संस्थेचा विकास आज मोठ्या स्वरुपात पुणे व मुंबई येथे झालेला आपल्याला दिसतो.

ग्रामीण कामाचा विकास या चिंतनातून मौनी विद्यापीठ गारगोटी, जि.कोल्हापूर हे अस्तित्वात आणले. आचार्य भागवत यांच्याबरोबर कार्य केले.

खेड्यापाड्यातील शैक्षणिक सामाजिक ,आर्थिक विकास योजना सुरु केल्या.या सर्व कार्यास चित्राताई यांचे विधायक व चिंतनशील गुणांची साथ लाभली .सन १९५८ ला मौनी विद्यापीठ सोडून ते मुंबईस परत आले.

सन १९५५ ला मुंबईत राज्य सरकारचे सल्लागार म्हणून निमंत्रित करण्यात आले.येथे घाटे,परुळेकर योजना प्राथमिक शिक्षणाचा इतिहास मुंबई राज्याच्या शिक्षणखात्याचा इतिहास हे लेखन नाईक यांनी केले.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन या संस्थेच्या पुर्नबांधणीत लक्ष घालू लागले. सन १९४८ ते १९५९ .

सन १९५९ ते १९७३ या काळात केन्द्र सरकारात शिक्षण सल्लागार म्हणून कार्य ---

सन १९५९ मध्ये जे.पी.नाईक यांना मध्यवर्ती सरकारच्या शिक्षण खात्याने शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी दिल्लीला बोलावले.आपल्या स्वतंत्र व ध्येयवादी विचाराला कसल्याही प्रकारची मुरड न घालता कार्य करण्याची परवानगी अट - सरकारला घालून केन्द्र सरकारच्या कामाचा त्यानी स्वीकार केला.

दिल्लीत शिक्षण खात्यात काम करत असताना त्यानी पगार घेण्याचे नाकारले व विना वेतन काम केले. अर्थात ते त्यांच्या लेखनातून व लिहिलेल्या ग्रंथाच्या रॉयल्टीवर आपला जीवन चरितार्थ त्यानी भागविला. दिल्लीत ते प्रथम प्राथमिक शिक्षणाचे सल्लागार म्हणून काम करत कारण त्यानी अनेक पदावर काम केले. सन १९६४-६६ या काळात त्यानी एज्युकेशन कमिशनचे एक मेंबर म्हणून काम केले. पुन्हा ते शिक्षण मंत्रालयात आले. सन १९७३ पर्यन्त काम करुन ते निवृत्त झाले.तरी ते मेंबर - सेक्रेटरी म्हणून सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशन हे काम करत कारण शिक्षणाच्या विकास कार्यास मदत करत होते. अनेक शिक्षण मंत्र्याबरोबर जवळ जवळ ९ मंत्र्याबरोबर त्यानी काम केले.त्यांच्या वेगवेगळ्या प्लॅनिंग कमिशनशी संबंध आला.

सन १९६७ ते १९७८ या कालातील कार्य --

इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च या संस्थेत मुख्य एक्झिक्युटिव्ह म्हणून काम करत पुढे या आय.पी.एस.एस.आर.चे पहिलेच मेंबर सेक्रेटरी झाले.जवाहरलाल नेहरु विद्यापीठ दिल्ली ही संस्था उभारण्यात त्यांचा सहभाग मोठा होता.

सन १९७३ मध्ये भारत सरकारच्या जबाबदारीतून मोकळे झाल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन या संस्थेच्या पुनर्घटनेकडे लक्ष वळविले.

विद्याभारती या संस्थेत मार्गदर्शक सल्लागार म्हणून कार्य केले. सन १९७७ पासून अनौपचारिक शिक्षण सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण व या विषयीचे अनेक कृती संशोधन प्रकल्प हाती घेतले होते.

केन्द्र सरकारमध्ये केलेल्या कार्याबद्दल त्याना सन १९७४ मध्ये पद्मभूषण हा किताब देऊन गौरव करण्यात आला.

अनेक आंतर राष्ट्रीय संस्था व संघटनाचे ते शिक्षण विषयक सल्लागार होते. युनेस्को चे शिक्षण सल्लागार या नात्याने त्यांच्या बाहेरील देशांशी निकटचा संबंध आला. अशिया खंडात सक्तीचे व प्राथमिक शिक्षण सक्तीचे कसे करता येईल याचा आराखडा त्यानी उभारला. अशा जे.पी.नाईक यांचा मृत्यू कर्करोगाने १ ऑगस्ट १९८१ मध्ये झाला व थोर विचारवंतास भारताने गमावले.

नाईक यांना श्रध्दाजली वाहताना रा.कृ.कणबरकर (शिवाजी विद्यापीठ, कुलगुरु ) म्हणाले ` कै.नाईक म्हणजे शिक्षण क्षेत्रातील हिमालय होते.शिक्षण हे साध्य नव्हे तर साधन आहे ते चिरंतन आहे हे नाईक यांचे विचार लक्षात घेता सध्याची शिक्षणाची चिंता वाटते.` ८

जे.पी.नाईक हे फार मोठे शिक्षण तज्ज्ञ होते.शिक्षण हा त्यांचा खास आवडीचा विषय ते व्यासंगी होते,अधिकारी ,विद्वान होते.

गनर मिर्दाल सारख्या सापेक्षी आणि चिकित्सक विद्वानाने आपल्या एशियन ड्रामा या ग्रंथात जे.पी.वर स्तुतिसुमनाचा वर्षाव केला आहे.` ९

त्याचे वैशिष्टय म्हणजे भविष्याकडे लागलेली त्याची दृष्टी,व वर्तमानात रोवलेले खंबीर पाय यामुळे त्यानी पाहिलेली स्वप्ने स्पष्ट असत` शतकानुशतके

शिक्षणाच्या संस्कारापासून वंचित राहिलेल्या दुर्दैवी लोकांना शिक्षण देताना बुध्दाचा प्रेमळपणा आवश्यक आहे, शिक्षणाचा कस टिकावा म्हणून शंकराची तर्ककठोरता आणि प्रसारासाठी बुध्दाची करुणा यांचा आदर्श संगम घडवून शिक्षणाचा ख-या अर्थाने प्रसार करण्याचे त्याचे स्वप्न होते.` [१०]

कोल्हापूरचे नामवंत पत्रकार सर्जेराव पाटील यांनी तर नाईक व त्याचे कर्तृत्व याचे समीकरणच घातले होते.` किल्लाण बुध्दिमत्ता अहोरात्र श्रम करण्याची अचाट शक्ती कोणताही विषय डोक्यात घेतला तर अल्पकालातच त्याचा संपूर्ण अभ्यास व त्या विषयावर असामान्य प्रभुत्व संपादन करण्याची कुशाग्रता ज्यांच्या ठिकाणी एकवटली आहे ते म्हणजे श्री.जे.पी.नाईक.` [११]

नाईक यांच्या जीवनात अंगिकृत कार्य व अतिकृत संस्था सोडून जाण्याचे प्रसंग आले पण एकदा हाती कार्य घेतले की ते सिध्दीस नेले.त्यासाठी अविश्रांत श्रम करणे असेच धोरण नाईक यांनी ठेवले होते पण कुठेही एकाच ठिकाणी ते फार काळ टिकून रहात नसत. भांडण अगर मतभेद हे व्यक्तिव्यक्तीमध्ये फारतर असतात .संस्थेशी अगर कार्याशी ते असूच शकतच नाही हे त्याचे ठाम मत होते.

एखाद्या संस्थेची उभारणी केली ती स्वत:च्या पायावर उभी राहिली तिचे कार्य व्यवस्थित सुरु झाले की नाईक हे त्या कार्यातील लक्ष काढून घेत कमी करत.

प्रसिध्दीपासून ते नेहमी दूर रहात मला मी माझे हे शब्दप्रयोग क्वचित वापरत. स्वत: नामानिराळे राहून कामाचे श्रेय दुस-याला देण्याच्या खटपटीत ते असत उदा.कोठारी आयोग अहवाल शिक्षणाचा इतिहास या सारखे लेखन सहजगत्या दुस-याच्या नावार प्रसिध्द केले.

लाखो रुपयाचे व्यवहार त्यानी केले पण स्वत: कफल्लकच राहिले.

शेले कीटस् ब्राउनिंग अशा कविच्या कविता ,कालिदास भवभूती संस्कृत कवीचे वाङ्.मय उतारे त्याना पाठ असत.

शिक्षण हा विकास योजनेचा एक आधार कधीच बनू शकत नाही याची जे.पी.नाईक यांना जाणीव होती.शिक्षणाचा आरोग्य सेवेशी संबंध जोडला पाहिजे या विचारातून ` अॅाल्टरनेटिव्हज् इन हेल्थ ` ही कल्पना त्यांनी मांडली.[१२]

' जे.पी.नाईक यांचे व्यक्तिमत्व म्हणजे उसळत्या चैतन्याचा एक अखंड झोतच .आळस कंटाळा चालढकल हे शब्द त्यांच्या वाऱ्यालाही उभे रहात नसत. शास्त्रज्ञाची श्रध्दा कलावंताचे हृदय यंत्रज्ञाचे हात घेऊन जे.पी.नाईक जन्माला आले होते.

अखेरच्या काळात कोरगांवकर या संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारुन अनेक सामाजिक कार्य योजना आखल्या.

शिक्षणाच्या मूलगामी परिवर्तनाचा विचार हे नाईक यांच्या जीवनाचे मुख्य सूत्र होते. यासाठीच ते खेड्यात प्राथमिक शिक्षक म्हणून अनेक वर्ष राहिले. वरच्या स्तरावर खेड्यातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे म्हणून गारगोटीचे मौनी विद्यापीठ उभे राहण्यासाठी ते धडपडले. शिक्षण आयोग शिक्षण मंत्रालय समाजशास्त्र संशोधन संस्था या अनेकविध स्तरावर या परिवर्तनाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यानी केला.[१३]

संकटे येत त्यांच्याशी झगडत कार्यपूर्ती हे नाईक यांच्या जीवनाचे ध्येय बनले होते.

आज सर्वच क्षेत्रात असामाजिक विध्वंसक भ्रष्टाचारी कार्यांचे प्रचंड उधाण पहावयास मिळते.परंतु राष्ट्र समर्पित विधायक व विकासास योग्य कार्य विचार मांडणारे स्वतः काही पावले या दृष्टीने चालणारे आत्मनिरीक्षा निर्माण करणारे असे जे.पी.नाईक यांचे व्यक्तिमत्व होते.

The Progress of Education या मासिकात त्याचे वर्णन खालील प्रमाणे केले आहे —

" He was a visionary adreamer and was eager to see his dreams come true ".

संकटाना सामोरे जाण्याची ताकद त्यांच्यात होती त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्व (vrsatile ) उत्तुंग बनले होते अशा या विचारवंत शिक्षण तज्ञ, प्रशासक,सल्लागार अशा जे.पी.नाईक यांचे नाव भारतीय इतिहासात मोठे व प्रभावी मोलाचे कार्य करणारे म्हणून नोंदवावे लागेल.

आपल्या ३४ वर्षांच्या कारकिर्दीत जे.पी.नी ख-या अर्थाने आपल्या देशबांधवावर प्रेम केले त्याच्यासाठी ते अहोरात्र झटले.[१४]

## संदर्भ ग्रंथ सूची


१ Indian Institute of Education -J.P.Naik - Memorial Issue - 1982 - Page No.2

२ वाळिंबे वि.स. - जीवन शिक्षण - सप्टेंबर १९८२ - पृ.४

३ सकाळ - ३० सप्टेंबर - १९८१ - पृ.९

४ संपादक - साधना - १२-९-१९८१- (अंक पूर्ण ) पृ.१७

५ पाटील पी.सी.- माझ्या आठवणी - मौज प्रकाशन गृह,मुंबई-४, पृ.२६६

६ बागल माधवराव - अखंड भारत - ३ मे १९४५

७ संपा.दै.पुढारी - गुरुवार १७ फेब्रुवारी १९४४ - पृ.२

८ सकाळ.(दैनिक ) - ४-९-९१

९ कुलकर्णी वि.गो. - लोकसत्ता - ८-९-८१- पृ.६

१० कुलकर्णी वि.गो. - लोकसत्ता - ८-९-८१-पृ.६

११ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.८०

१२ डोंगरे ग.शं.- तरुण भारत - ८-९-८१

१३ दामोळकर देवदत्त - सकाळ - ३१ ऑगस्ट,१९८१

१४ लोकसत्ता - ८-९-८१ - पृ.८